# प्रेसनोट

## मौजमजा करण्याकरीता कट रचुन दरोडा टाकणाऱ्या आरोपीतांना २४ तासात पिस्टलसह अटक करून, रोख रक्कम, पिस्टल, मोबाईल व दोन दुचाकी वाहनासह ४,४५,०००/- रू चा मुद्देमाल हस्तगत. दरोडा विरोधी पथकाची कामगिरी.

दिनांक ०१/०९/२०२१ रोजी रात्री ०९:०० वाचे सुमारांस चिंचवड पोलीस ठाणे हद्दीतील स्पाईन रोड, वाल्हेकरवाडी, चिंचवड येथे साई स्टील ट्रेडर्स प्रा. लि. कंपनीचे मालक फिर्यादी नामे भिमसेन वर्दीसिंग राजपुत यांनी फिर्याद दिली की, **साई स्टील ट्रेडर्स प्रा. लि.** कंपनीतील कामगारांचे पेमेन्ट घेवुन कंपनीत काम करणारा **ड्रायव्हर अभिषेक शिरसाठ** हे सहकार्यासह जात असताना दोन मोटार सायकल वरील ०५ इसमांनी अभिषेक शिरसाठ यास आडवुन, मारहान करून, पिस्टलचा धाक दाखवुन, फिर्यादी यांचेकडील ७,०३,६५०/- रोख रक्कम असलेली काळे रंगाची सॅक बॅग ही दरोडा टाकुन नेली. त्याबाबत **चिंचवड पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नंबर २८४/२०२१ भादवि कलम ३९५, १२०(ब), भारतीय हत्यार कायदा कलम ३(२५) व महा. पो. अधि. कलम ३७(१)(३) सह १३५** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यांत आला होता. त्याबाबत दरोडयाचे गांर्भिर्य लक्षात घेवुन, मा. वरिष्ठांनी सदरचा गुन्हा उघडकीस आणणेबाबत गुन्हे शाखेकडील सर्व पथकांना आदेशीत केले होते. त्याअनुषंगाने वेगवेगळी पथके तयार करून, गुन्हयाचा तपास सुरू केला. त्याप्रमाणे दरोडा विरोधी पथकाने गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवुन, गुन्हयाबाबत सविस्तर माहिती घेवुन, एक पथक तयार केले. त्यांना गुन्हा घडलेल्या परिसरातील सीसीटिव्ही फुटेज चेक करून, आरोपींचे वर्णनाची माहिती घेवुन, बातमीदारांशी संपर्क साधुन, मोटार सायकल वरील अनोळखी इसमाचा माहिती काढुन कळविणेबाबत सुचना दिल्या होत्या.

त्याप्रमाणे सपोनि सिध्देश्वर कैलासे, पोउपनिरी मंगेश भांगे, पोलीस अंमलदार खारगे, पुलगम, बनकर, लोखंडे, शेडगे, कोकणे, माने, व कौशल्ये असे मोटार सायकल वरील अनोळखी इसमांचा चिखली पोस्टे हद्दीत शोध घेत असताना **पोलीस उप निरीक्षक मंगेश भांगे, पोलीस नाईक आशिष बनकर** यांना एका बातमीदाराकडुन बातमी मिळाली की, तीन संशयीत आरोपी हे हुमा बेकरीच्या मागे, पार्किंगमध्ये, चिखली, पुणे येथे थांबलेले आहेत, सदरचा गुन्हा त्यांनी केलेला असावा अशी बातमी मिळाले वरून, वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम तांगडे यांनी पथकास मार्गदर्शन करून सापळयाची कारवाई सुरू करून, मिळालेल्या बातमीच्या ठिकाणी जावुन, चारही बाजुने घेराव घातला. सापळा रचुन सदर परिसरातील स्थानिक रहिवासी असल्याचे भासवुन २०:४० वाचे सुमारांस इसम नामे **१) यश गणेश आगवणे,** वय १९ वर्षे, रा. त्रिमुर्ती हौसिंग सोसायटी, **रूपीनगर, तळवडे,** पुणे **२) कासीम मौला मुर्शीद,** वय २१ वर्षे, रा. पुण्य हौसिंग सोसायटी, घर नंबर २०४, **ओटा स्किम निगडी,** पुणे **३) सागर आदिनाथ पवार,** वय १८ वर्षे, रा. सिध्दार्थनगर झोपडपट्टी, आझाद चौक, **ओटास्किम निगडी,** पुणे यांना ताब्यात घेवुन, पंचासमक्ष त्यांची अंगझडती घेता **यश आगवणे** याचेकडुन **५०,०००/-** रू रोख रक्कम व मोबाईल फोन, **कासीम मुर्शीद** याचेकडुन **१,५०,०००/-** रू रोख रक्कम, एक लोखंडी गावठी बनावटीचा देशी कट्टा (पिस्टल) व मोबाईल फोन, तसेच **सागर पवार** याचेकडुन **६५,०००/-** रू रोख रक्कम व मोबाईल फोन अशी एकुण **२,६५,०००/- रू रोख रक्कम** तसेच त्यांनी गुन्हा करतेवेळी वापरलेल्या नविन होंडा शाईन मोटार सायकल व ॲक्टीव्हा मोपेड अशी एकुण मिळुन ४,४५,०००/- **रू रोख रक्कम, एक लोखंडी गावठी बनावटीचा देशी कट्टा (पिस्टल), तीन मोबाईल फोन व दोन मोटार सायकली मिळुन आल्या.** त्यांच्याकडे सदर

रक्कमेबाबत कौशल्य पुर्वक तपास करून विचारपुस करता त्यांनी सदरचा गुन्हा त्यांचे **इतर तीन साथीदारांचे** मदतीने केला असल्याची कबुली दिली.

कंपनीचा ड्रायव्हर अभिषेक शिरसाठ व गुन्हयातील आरोपी हे ऐकमेकांचे परिचयाचे असुन, दाखल गुन्हयातील अटक व पाहिजे आरोपी यांचेवर उसनवारी घेतलेले पैसेचे कर्ज होते तसेच त्यांना मौजमजा करण्याकरीता पैश्याची गरज असल्याचे त्यांनी कंपनीचा **ड्रायव्हर अभिषेक शिरसाठ** याचेसह कंपनीचे पैसे लुटण्याचा कट रचण्यात आला होता. पैसे घेवुन जाणारा कंपनीचा ड्रायव्हर शिरसाठ हा त्या कटात सामिल असल्याचे तपासात निष्पन्न झाले. शिरसाठ याने आरोपींना पुर्ण माहिती दिली होती. पैसे घेऊन निघाल्याचे त्याने आरोपींना सांगुन लुटलेल्या पैश्यातील **जास्त हिस्सा** हा शिरसाठ यास देण्याचे ठरले होते. तसेच त्याने **मला जास्त मारू नका** असे सांगुन मी नंतर तक्रार देण्यास जाईल याबाबत आरोपींना सांगितले होते. त्याप्रमाणे अभिषेक शिरसाठ हा गुन्हा घडल्यानंतर तो स्वतः च तक्रार देण्यासाठी पोलीस स्टेशन येथे आला होता. परंतु त्याच्यावर आमचा संशय असल्याने, सदर गोष्टीची कोठेही वाच्छता न करता त्याच्या हालचालीवर बारीक लक्ष ठेवुन दरोडा विरोधी पथकाने समांतर तपास सुरू केला. गुन्हयाबाबतची व आरोपीबाबतची सर्व माहिती निष्पन्न करण्यात आली आहे. उर्वरित तीन आरोपीतांचा शोध घेत आहोत.

दाखल गुन्हयातील अटक आरोपी हे पोलीस रेकॉर्डवरील गुन्हेगार असुन, त्यांचेवर खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत.

**आरोपी १) कासीम मौला मुर्शीद याचेवर दाखल गुन्हे.**

१) भोसरी पोलीस ठाणे गुरनं ५८५/२०१९ भादवि कलम ३९५, महा. पो. अधि. ३७(१)(३) सह १३५

२) भोसरी पोलीस ठाणे गुरनं ५१७/२०१९ भादवि कलम ३७९

३) भोसरी पोलीस ठाणे गुरनं ५८४/२०१९ भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५)

**आरोपी २) यश गणेश आगवणे याचेवर दाखल गुन्हे.**

१) निगडी पोलीस ठाणे गुरनं ५८८/२०१९ मो.वा.का. ६६(१) १९२ अ, ३(१) १८१, ५/१८०

सदरची कारवाई पिंपरी-चिंचवड आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, अपर पोलीस आयुक्त डॉ. संजय शिंदे, पोलीस उप आयुक्त श्री. सुधीर हिरेमठ, सहा.पोलीस आयुक्त डॉ. प्रशांत अमृतकर यांचे मार्गदर्शनाखाली दरोडा विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री उत्तम तांगडे, सहा. पोलीस निरीक्षक सिध्देश्वर कैलासे, पोलीस उप निरीक्षक मंगेश भांगे, तसेच पोलीस अंमलदार आशिष बनकर, नितीन लोखंडे, महेश खांडे, राहुल खारगे, उमेश पुलगम, राजेंद्र शिंदे, विक्रांत गायकवाड, गणेश कोकणे, प्रविण कांबळे, प्रविण माने, सागर शेडगे, राजेश कोशल्ये व औदुंबर रोंगे तसेच तांत्रिक विश्लेषन विभागाचे नागेश माळी यांचे पथकाने केली आहे.

(**सुधीर हिरेमठ**)
पोलीस उप आयुक्त,
गुन्हे, पिंपरी-चिंचवड